**Following extension Activity and outreached Programmes conducted by the institution through various Departments in the academic year 2022-2023**

| Activity | Organizing unit/ agency/ collaborating agency | Year of the activity | Number of students Participation |
|---|---|---|---|
| “Bharat Ratna Dr Babasaheb Ambedkar Social Saint” | NSS unit MFM Warud | 2022-23 | 50 |
| Maheti aadhikar Saptaha | NSS unit MFM Warud | 2022-23 | 50 |
| Matadan Nodani | NSS unit MFM Warud | 2022-23 | 50 |
| Constitutional Day | NSS unit MFM Warud | 2022-23 | 40 |
| World AIDS Day | NSS unit MFM Warud | 2022-23 | 40 |
| Rashtriya Matadan Din | NSS unit MFM Warud | 2022-23 | 40 |
| Visit to "Surali grampanhyat" | Political Science Department | 2022-23 | 12 |
| Eco-friendly Holi Colour Making Workshop for School Students | Botany Department | 2022-23 | 48 |

**Report of Extension Activity conducted by various department 2022-23**

# NATIONAL SERVICE SCHEME

## नियमित कार्यक्रम अहवाल २०२२-२३

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संलग्नित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय वरुड येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकांची जबाबदारी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. अतुल वंजारी व डॉ. रीना बकाले यांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये रासेयो पथकाद्वारे नियमित कार्यक्रम अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दि १३ एप्रिल २०२२ रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संत कार्यक्रम अंतर्गत वरुड शहरामध्ये रॅली चे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅली मार्फत विद्यार्थ्यांनी वरुड नगरीतील लोकांना संविधानाचे महत्व पटवून देत विविध पथनाट्य सादर केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे जुलै २०२२ मध्ये धनोडी या गावी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर वृक्षारोपण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जी एन चौधरी यांच्या हाताने करण्यात आले. सदर वृक्षारोपणाचा ग्राम पंचायत धनोडी चे सहकार्य लाभले.

दि. ७ ऑगस्ट २०२२ रोजी वरुड शहरामध्ये आलेल्या भयावह महापूरमध्ये बेघर झालेल्या लोकांच्या मदतीसाठी महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी धाव घेत जनहिताचे कार्य केले. तसेच रुग्णांना दवाखान्यामध्ये ने-आन करणे, जेवणाची व्यवस्था करणे, त्यांना औषधी देणे इत्यादी कामांकरिता रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ६ ओक्टोम्बर ते १२ ओक्टोम्बर २०२२ माहिती अधिकार सप्ताह साजरा करण्यात आला. या उद्देशाने "माहितीचा आधिकारी" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाकरिता प्रमुख वक्ते म्हणून वरुड येथील तहसीलदार गजेंद्र मालथने यांनी विद्यार्थ्यांना माहितीचा धिकारी कायदा केव्हा अस्तित्वात आला, त्याचा अर्थ, व्यक्तीच्या जीवनात तो किती महत्वपूर्ण आहे तसेच भ्रष्टाचार व पारदर्शक प्रशासनासाठी तो किती महत्वपूर्ण आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दि १९ सप्टेंबर २०२२ रोजी मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले. सदर कार्यक्रमाकरिता वरुड येथील तहसीलदार गजेंद्र मालथने व नायब तहसीलदार सौ. प्रतिभा चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व पटवून देत नवीन मतदार नोंदणीकरिता उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे संविधान दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाकरिता प्रमुख विख्यात म्हणून आत्माराम निस्वाडे यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी संविधानाची गरज, त्यासाठी संविधान निर्मात्यांना घ्यावे लागलेले कष्ट याविषयी आपले मत स्पष्ट केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य जी एन चौधरी यांनी संविधान निर्मात्यांनी महान हुतात्म्यांबद्दल दाखविलेली कृतज्ञता याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि.१ डिसेम्बर २०२२ जागतिक एड्स दिनानिमित्य राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाकरिता राष्ट्रीय सेवा योजना व ग्रामीण रुग्णालय वरुड तर्फे वरुड शहरात रॅली चे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅली मधून गावकरी लोकांना एड्स हा आजार कसा होतो व त्यापासून बचाव कसा केला जाऊ शकतो याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

रासेयो विद्यार्थिनी कु.रोशनी बावणे हिची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई तर्फे आयोजित राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे २०२२-२३ मध्ये निवड करण्यात आली होती. कु. रोशनी बावणे हिची एकल नृत्य व गायन या स्पर्धेसाठी निवड करण्यात आलेली होती.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रीय मतदार दिन दि २५ जानेवारी २०२३ रोजी साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाकरिता प्रमुख वक्ते म्हणून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी महाविद्यालय शेंदुर्जना घाट येथील प्राचार्य डॉ. फुलारी यांनी विद्यार्थ्यांना मतदानाच्या हक्काबद्दल मार्गदर्शन करत सभागृहाला संबोधित केले.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी पुरस्कृत केलेल्या व अमरावती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने आयोजित केलेल्या "आपदा मित्र" या १२ दिवसीय निवासी प्रशिक्षण दि.६/२/२३ ते १७/२/२३ या कालावधीमध्ये महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक यश झाडे व ऋषिकेश माळोदे यांनी प्रशिक्षण पूर्ण केले.


GPS Map Camera
Warud, MH, India
NH 353J, Approach Road Area,
Lat 21.475708, Long 78.264490
09/19/2022 01:00 PM


GPS Map Camera
Google
Warud, Maharashtra, India
F7F9+93F, Warud, Maharashtra 444906, India
Lat 21.473724°
Long 78.267148°
13/04/22 10:40 AM






vivo Y51


vivo Y51




ता. वरुड, जि. अमरावती ४४४९०६ (महाराष्ट्र)
GPS Map Camera
Warud, Maharashtra, India
F78C+P5F, Police Station Rd, Sawta Square, Warud,
Maharashtra 444906, India
Lat 21.466633°
Long 78.270372°
01/12/22 09:30 AM GMT +05:30
Google



State Level Social and Cultural Competition UTKARSH 2022-23

राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा

उत्कर्ष : २०२२-२३

सहभाग प्रमाणपत्र/Participation Certificate


श्री./कु. Mr. /Ms. रोशनी देवराव बावने

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

यांनी दि. २ ते ५ जानेवारी २०२३, दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा 'उत्कर्ष २०२२-२३' मध्ये सहभाग नोंदविल्याबद्दल सदर प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

*is certified for participating in State Level Social and Cultural Competition Utkarsh 2022-23 jointly organized by NSS Cell, Ministry of Higher and Technical Education, Government of Maharashtra and Dept. of NSS, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur from 2nd to 5th January, 2023.*

| Dr. Kedarnath Kalwane | Dr. Gunvant Sarwade | Dr. PrashantKumar Wananje | Dr. Mrunalini Fadnavis |
|---|---|---|---|
| Co-ordinator Utkarsh 2022-23 | Director, NSS | SLO & OSD NSS Cell | Vice Chancellor |
| Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur | Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur | Government of Maharashtra | Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur |



महाराष्ट्र शासन

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी/श्री./श्रीमती ऋषिकेश मु. माळोदे ; रा.गणेशपूर यांनी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (SDMA) यांनी पुरस्कृत केलेल्या व अमरावती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (DDMA) आयोजित केलेले "आपदा मित्र" या १२ दिवसांचे निवासी प्रशिक्षण दिनांक :- ०६/०२/२३ ते १७/०२/२३ या कालावधीमध्ये यशस्वीरित्या पुर्ण केले आहे.

आपण कर्तव्य व सामाजिक जबाबदारीचे भान राखून "आपदा मित्र" म्हणून कार्य करण्यास इच्छा दर्शविल्याने संभाव्य आपत्तीच्या काळातील मदत कार्यात तत्परतेने सहभागी होवून आपले योगदान चालू अशी अपेक्षा व्यक्त करते.

आपल्या पुढील वाटचालीस शुभेच्छा..... !

दिनांक :- २७/०२/२०२३

ठिकाण :- अमरावती.

पवनीत कौर (भा.प्र.से.)

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अमरावती



अमरावती ■ शनिवार, 28 जनवरी 2023 ■ अमरावती, नागपुर, अकोला, यवतमाल, बुलढाणा, वाशिम व वर्धा का लोकप्रिय हिन्दी दैनिक ■ अंक - 2 ■ वर्ष - 30 ■ पृष्ठ -16 ■ मूल्य - 6.00 रु.
प्रतिदिन अखबार
www.pratidinakhabar.com

# म. फुले महाविद्यालय में मतदाता दिन




**वरुड़-** महात्मा फुले, कला, वाणिज्य व सीताराम चौधरी विज्ञान महाविद्यालय के राज्यशास्त्र विभाग की ओर से राष्ट्रीय मतदाता दिन मनाया गया. डॉ. यू.ई. चौधरी, प्राचार्य डॉ. राम फुलारी के हाथों म. फुले व डॉ. पंजाबराव देशमुख की प्रतिमा का पूजन किया गया. पश्चात प्रमुख वक्ता प्राचार्य डॉ. फुलारी ने विद्यार्थियों को मतदाता का महत्व बताया. विभाग प्रमुख प्रा. डोलस व विद्यार्थी उपस्थित थे.

स्वतंत्र वृत्तपत्र
दिव्य मराठी
दिव्य सिटी

# वरुड येथील महात्मा फुले महाविद्यालयातर्फे एड्स जनजागृती रॅलीद्वारे जनजागृती




**शेंदुरजनाघाट** | जागतिक एड्स दिवसाचे औचित्य साधून वरुड येथील महात्मा फुले महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रेड रिबिन क्लब व ग्रामीण रुग्णालयाच्या संयुक्त सहकार्याने वरुड येथे एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन केले होते. या वेळी ग्रामीण रुग्णालयातर्फे विद्यार्थ्यांना एड्स आजार कसा होतो व त्यापासून बचाव कसा केला जाऊ शकतो, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयातून प्रारंभ झालेल्या रॅलीचा केदार चौक येथे समारोप करण्यात आला. या वेळी रासेयो स्वयंसेवकांना प्राचार्य प्रा. डॉ. जी. एन. चौधरी यांनी एड्सबद्दल मार्गदर्शन केले. ही रॅली रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अतुल वंजारी यांच्या मार्गदर्शनात काढली.

**Social Media Link:**

1) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1627568166061895680?t=WP9Z_z97Otm2iGR20zCiOA&s=08
2) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1598191628019445761?t=v-9ktTzxf-zD9x8lPEMuqw&s=08
3) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1597566069086257158?t=W8GSAbDjZpXKeCYjE66_0A&s=08
4) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1572281262043443208?t=ZgmiYQObLRZKuXdQrxQgJw&s=08
5) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1572281262043443208?s=08
6) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1560674035951759360?t=enLlwAa4iPqfEDUvMWyZJQ&s=08
7) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1559875279157227520?t=KB3JlNKIydwrH_qhZwN17w&s=08

# NATIONAL SERVICE SCHEME
# विशेष श्रमसंस्कार शिबीर २०२२-२३

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संलग्नित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय वरुड येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीर दत्तकग्राम राजुरा बाजार ता-वरुड जिल्हा-अमरावती येथे २६ फेब्रुवारी २०२३ ते ४ मार्च २०२३ या कालावधीमध्ये संपन्न झाला. प्राचार्य डॉ. जी एन चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. अतुल वंजारी व डॉ.रीना बकाले यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला. या शिबिरात प्रार्थना, योगासने, ग्राम स्वच्छता अभियान, लसीकरण सर्वेक्षण, मतदान व संविधान जनजागृती रॅली, गावकऱ्यांशी चर्चा असे विविध उपक्रम राबविण्यात आले. बौद्धिक सत्रामध्ये मान्यवरांची अभ्यासपूर्ण व्याख्याने आयोजित करण्यात आलेत. १०० रासेयो स्वयंसेवक, स्वयंसेविका यांच्या श्रमदानातून दत्तकग्राम राजुरा बाजार येथील एक एकर ई-क्लास जमिनीवरती डॉ. पंजाबराव देशमुख अमृत सरोवराचे निर्माण करण्यात आले. या कामाकरिता शिबिरार्थीच्या श्रमदानातून खर्च वाचविण्यास मदत तर झालीच शिवाय गावकऱ्यांना व स्वयंसेवकांना श्रमदानाचे महत्वही पटले.
कार्यक्रम पत्रिकेनुसार अहवाल

नियोजित कार्यक्रम पत्रिकेनुसार शनिवार दि. २५फेब्रुवारी २०२३ दुपारी ३ वाजता शिबिरार्थीचे दत्तकग्राम राजुरा बाजार येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, राजुरा बाजार येथे आगमन झाले. तदनंतर परिसर स्वच्छता, शिबिराचे नियोजन, शिबिरार्थीची नाव नोंदणी, गावकऱ्यांशी गट चर्चा, प्रकल्पाची पाहणी, निवास, भोजनाचे व दुसऱ्या दिवसाच्या श्रमदानाची तयारी केली.

रविवार दि २६ फेब्रुवारी २०२३ ला सकाळी प्रार्थना, योगासने व परिसर स्वच्छता झाल्यानंतर दत्तकग्राम राजुरा बाजार येथे ज्ञानगंगा घरोघरी या पथनाट्याच्या सादरीकरण रासेयो स्वयंसेवकांद्वारे करण्यात आले. तदनंतर दुपारी ३ वाजता सदर शिबिराचे उदघाटन वरुड मोर्शी मतदार संघाचे आमदार मा.श्री. देवेंद्र भुयार यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या उदघाटन प्रसंगी अध्यक्ष स्थान श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. हर्षवर्धन उपाख्य भैयासाहेब देशमुख यांनी भूषविले. तर प्रमुख उपस्थित म्हणून श्री. शिवाजी शिक्षण संस्थेतील कार्यकारणी मंडळी यांची उपस्थिती होती. सायंकाळी ६ वाजता प्रार्थना व स्मृतिगीते झाल्यानंतर गावकर्त्यांना भाऊसाहेबांच्या चित्रफितीचे प्रक्षेपण करण्यात आले.

सोमवार दि २७ फेब्रुवारी २०२३ ला सकाळी प्रार्थना, योगासने व परिसर स्वच्छता झाल्यानंतर दत्तकग्राम राजुरा बाजार येथील अमृत सरोवर प्रकल्प निर्माणाकरिता श्रमदान करण्यात आले. नंतर बौद्धिक सत्रामध्ये मा. श्री. शेषरावजी खाडे, माजी सचिव श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांनी "भारतीय राज्यघटना" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम संगीत संध्येचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये गायक राजेश उमाळे व सहकलाकार यांनी व रासेयो स्वयंसेवकांनी सादरीकरण केले.

मंगळवार दि २८ फेब्रुवारी २०२३ ला सकाळी प्रार्थना, योगासने व परिसर स्वच्छता झाल्यानंतर दत्तकग्राम राजुरा बाजार येथील अमृत सरोवर प्रकल्प निर्माणाकरिता श्रमदान करण्यात आले. नंतर गावकऱ्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीराकरिता स्वर्गीय दादासाहेब काळमेघ डेंटल

कॉलेज नागपूर, जिल्हा आरोग्य अमरावती, ग्रामीण रुग्णालय राजुरा बाजार इत्यादी चमूंनी गावकऱ्यांच्या आरोग्याविषयी समस्यांचे निराकरण केले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये रासेयो स्वयंसेवकांनी हरिपाठ व भजन यांचे सादरीकरण केले.

बुधवार दि १ मार्च २०२३ ला सकाळी प्रार्थना, योगासने व परिसर स्वच्छता झाल्यानंतर दत्तकग्राम राजुरा बाजार येथील अमृत सरोवर प्रकल्प निर्माणाकरिता श्रमदान करण्यात आले. नंतर गावकऱ्यांसाठी पशु वैद्यकीय रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये डॉ.संजय कावरे पंचायत समिती अमरावती, डॉ. पुरुषोत्तम सोळंके जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद अमरावती येथील चमूंनी गुरांच्या रोगाचे निराकरण केले. नंतर बौद्धिक सत्रामध्ये नवीन शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमध्ये विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम गावकऱ्यांसमोर सादर केले. सदर शिबिराला डॉ. डी. कार्तिकेयाने, क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना पुणे, भारत सरकार, श्री. मंगेश खैरनार, अकाउंट ऑफिसर, मंत्रालय मुंबई महाराष्ट्र शासन यांनी भेटी दिल्या व शिबिराचे कौतुक केले.

गुरुवार दि २ मार्च २०२३ ला सकाळी प्रार्थना, योगासने व परिसर स्वच्छता झाल्यानंतर दत्तकग्राम राजुरा बाजार येथील अमृत सरोवर प्रकल्प निर्माणाकरिता श्रमदान करण्यात आले. बौद्धिक सत्रामध्ये डॉ. सुरेंद्र पाटील, फालशास्त्र विभाग, पी. के. व्ही. डी. अकोला यांनी संत्रा मार्गदर्शनावरती राजुरा बाजार येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमध्ये विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम गावकऱ्यांसमोर सादर केले.

शुक्रवार दि ३ मार्च २०२३ ला सकाळी प्रार्थना, योगासने व परिसर स्वच्छता झाल्यानंतर दत्तकग्राम राजुरा बाजार येथील अमृत सरोवर प्रकल्प निर्माणाकरिता श्रमदान करण्यात आले. बौद्धिक सत्रामध्ये श्री. पंडितराव पेंडागळे माजी शिक्षणाधिकारी अमरावती यांनी महिला सक्षमीकरण, बचत गट आणि रोजगार मेळावा याबद्दल विद्यार्थ्यांना तसेच गावकरी महिलांना मार्गदर्शन केले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमध्ये विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम गावकऱ्यांसमोर सादर केले.

सदर शिबिराला डॉ. डी. कार्तिकेयाने, क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना पुणे, भारत सरकार, श्री. मंगेश खैरनार, अकाउंट ऑफिसर, मंत्रालय मुंबई महाराष्ट्र शासन यांनी भेटी दिल्या व शिबिराचे कौतुक केले.

RNI.NO.MAHMAR/2016/69769

# लोकसागर

अमरावती| बुधवार, १ मार्च २०२३ |वर्ष ७| अंक २६५ | पृष्ठ ६ | किंमत रु. २.०० | संपादक- जनक बागडे, मो. ९४०५३२०६६६ AMT/RNP/

## कायदा लोकांच्या विचारातून प्रसवला पाहिजे-शेषरावजी खाडे

**लोकसागर/ग्रा.प्र.**

**शेंदूरजनाघाट**–महाराष्ट्र शासन, आर्ट ऑफ लिव्हिंग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला,वाणिज्य सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय वरूड,कला व वाणिज्य महाविद्यालय जरुड,श्री आर आर लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी, वाय. डी.व्ही.डी.कला व वाणिज्य महाविद्यालय तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर ग्राम राजुरा येथे २६ फेब्रुवारी २०२३ ते ४ मार्च २०२३ येथे डॉ.राजेश बुरंगे संचालक , राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायत राजुरा बाजार यांच्या सहकार्याने संपन्न होत आहे.

दिनांक २७ /२ /२०२३ रोजी दुपारच्या बौद्धिक सत्रात 'भारताची राज्यघटना' या विषयावर शेषरावजी खाडे माजी सचिव श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पी.पी. देशमुख महात्मा फुले महाविद्यालय वरुड हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सुनील काळमेघ,महात्मा फुले महाविद्यालय वरुड तसेच सरपंच निलेश धुर्वे, ग्राम पंचायत राजुरा बाजार उपसरपंच प्रशांत बहुरूपी ग्राम पंचायत राजुरा बाजार मनोहर भोंडे सदस्य ग्राम पंचायत राजुरा बाजार हे उपस्थित होते.सर्व प्रथम डॉ.पंजाबराव देशमुख व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवर मंडळींच्या हस्ते करण्यात आले.

रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना श्री शेषरावजी खाडे यांनी भारतीय राज्यघटना निर्मितीचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. भारतीय राज्यघटनेचे सर्वांनी वाचन करणे गरजेचे आहे. २६ जानेवारी १९५० रोजी लागू झालेल्या संविधानाची आज प्रामाणिकपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. कारण सांप्रत स्थिती भयावह आहे आज विक्षिप्त कायदे निर्माण होत असून जनतेशी चर्चा न करता कायदे केले जातात हे कृत्य संविधान विरोधी आहे. याविषयी त्यांनी खंत व्यक्त केली. कायदा लोकांच्या विचारातून प्रसवला पाहिजे,तेव्हाच जनतेचे कल्याण होईल.आमदार खासदार हे मतदारांनी जन्माला घातलेले अपत्य आहे .लोकप्रतिनिधींनी लोकांचे म्हणणे ऐकले पाहिजे.हल्ली लोकशाहीची व्याख्या बदलली आहे. मतदार हा श्रेष्ठ असून लोकप्रतिनिधी हे लोकसेवक आहे.असे प्रतिपादन केले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पी.पी. देशमुख यांनी स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या न्यायाप्रमाणे प्रत्येकाशी वागावे. जीवन जगताना प्रत्येक माणसाने निर्भय असायला हवे,निर्भय नसेल तर माणसाची बुद्धिमत्ता नष्ट होण्याचा धोका संभवतो असे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून डॉ.कुसुमेंद्र सोनटक्के यांनी भारतीय राज्यघटना निर्मिती मागील देशाची भूमिका कोणती होती हे सांगितले.कार्यक्रमाचे संचालन प्रीतम खरे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु.किरण राऊत हिने केले याप्रसंगी श्री भाऊरावजी गोमकाळे आजीवन सभासद श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अतुल वंजारी,रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. शशिकांत काळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अश्विन लुंगे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.कुसुमेंद्र सोनटक्के तसेच महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.रिना बकाले,डॉ. शितल पारे प्रा.माधुरी राऊत, कु.अर्चना राऊत, सह-कार्यक्रम अधिकारी डॉ. अविनाश उल्हे डॉ.प्रशांत हरमकर, डॉ आम्रपाली पाटिल, डॉ.खुशाल इंगळे,डॉ नीता गिरी, प्रा. प्रणिता शंकरपाळे, सहकारी रवी महाजन, दिवाकर दूधकोहळे,गोपाल आजनकर, मोहम्मद अतिक तसेच चारही महाविद्यालयाचे ३०० रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

RNI.NO.MAHMAR/2016/69769

# लोकसागर

## कायदा लोकांच्या विचारातून प्रसवला पाहिजे

**लोकसागर/ग्रा.प्र.**

**शेंदूरजनाघाट**–राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर २६ फेब्रुवारी ते ४ मार्च ग्राम राजूराबाजार येथे डॉ.राजेश बुरंगे संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायत राजुरा बाजार यांच्या सहकार्याने संपन्न होत आहे.

दि.२७ फेब्रुवारी रोजी दुपारच्या बौद्धिक सत्रात 'भारताची राज्यघटना' या विषयावर शेषराव खाडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.पी.पी. देशमुख हे या वेळी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सुनील काळमेघ तसेच सरपंच निलेश धुर्वे , उपसरपंच प्रशांत बहुरूपी , मनोहर भोंडे हे उपस्थित होते. सर्व प्रथम डॉ.पंजाबराव देशमुख व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवर मंडळींच्या हस्ते करण्यात आले. रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना शेषराव खाडे यांनी भारतीय राज्यघटना निर्मितीचे महान कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. भारतीय राज्यघटनेचे सर्वांनी वाचन करणे गरजेचे आहे. २६ जानेवारी १९५० रोजी लागू झालेल्या संविधानाची आज प्रामाणिकपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. कारण सांप्रत स्थिती भयावह आहे. आज विक्षिप्त कायदे निर्माण होत असून जनतेशी चर्चा न करता कायदे केले जातात हे कृत्य संविधान विरोधी आहे. याविषयी त्यांनी खंत व्यक्त केली. कायदा लोकांच्या विचारातून प्रसवला पाहिजे तेव्हाच जनतेचे कल्याण होईल.आमदार , खासदार हे मतदारांनी जन्माला घातलेले अपत्य आहे.लोकप्रतिनिधींनी लोकांचे म्हणणे ऐकले पाहिजे. हल्ली लोकशाहीची व्याख्या बदलली आहे. मतदार हा श्रेष्ठ असून लोकप्रतिनिधी हे लोकसेवक आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.पी.पी. देशमुख यांनी स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या न्यायाप्रमाणे प्रत्येकाशी वागावे. जीवन जगताना प्रत्येक माणसाने निर्भय असायला हवे निर्भय नसेल तर माणसाची बुद्धिमत्ता नष्ट होण्याचा धोका संभवतो असे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून डॉ.कुसुमेंद्र सोनटक्के यांनी भारतीय राज्यघटना निर्मिती मागील देशाची भूमिका कोणती होती हे सांगितले.कार्यक्रमाचे संचालन प्रीतम खरे यांनी केले तर आभार प्रदर्शन किरण राऊत हिने केले. याप्रसंगी भाऊराव गोमकाळे , डॉ. अतुल वंजारी , प्रा. शशिकांत काळे , डॉ.अश्विन लुंगे,डॉ.कुसुमेंद्र सोनटक्के , डॉ.रिना बकाले , डॉ. शितल पारे , प्रा.माधुरी राऊत, अर्चना राऊत , डॉ.अविनाश उल्हे डॉ.प्रशांत हरमकर , डॉ आम्रपाली पाटिल , डॉ.खुशाल इंगळे , डॉ. नीता गिरी , प्रा.प्रणिता शंकरपाळे , रवी महाजन , दिवाकर दूधकोहळे , गोपाल आजनकर , मोहम्मद अतिक तसेच चारही महाविद्यालयाचे ३०० रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.



दैनिक भास्कर

## न्यूज इनबॉक्स

# राजुरा बाजार में हुआ दंत चिकित्सा व रोग निदान शिविर



जरुड़| महाराष्ट्र सरकार, आर्ट ऑफ लिविंग, संगाबा अमरावती विद्यापीठ, शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीताराम चौधरी विज्ञान महाविद्यालय वरुड़, कला व वाणिज्य महाविद्यालय जरुड़, आर आर लाहोटी महाविद्यालय मोर्शी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ मोर्शी, वाईडीव्हीडी कला व वाणिज्य महाविद्यालय तिवसा के संयुक्त तत्वावधान में रासेयो का विशेष श्रम संस्कार शिविर राजुरा में 26 फरवरी से 4 मार्च तक आयोजित है।

रासेयो शिविर में 28 फरवरी को दंत चिकित्सा व रोग निदान शिविर आयोजित किया गया। दिवंगत दादासाहब कालमेघ दंत महाविद्यालय व डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति महाविद्यालय अमरावती के संयुक्त तत्वावधान में आयोजित दंत चिकित्सा व रोगनिदान शिविर में डॉ. जूजेर रसुल व समाजसेवक डॉ. हरीश लाड के मार्गदर्शन में डॉ. प्रसाद नाजपांडे, डॉ. आदिनाथ सानप, डॉ. सृष्टि ठाकरे, डॉ. तेजश्री केने, डॉ. संघर्ष भगत, डॉ. निष्ठा सोनकुसरे, डॉ. वैष्णवी पुंडलिक, डॉ. इत्तेशाम शेख, डॉ. चारु शेंडे, डॉ. मृणाल गिरी, डॉ. वेदिका जैन, डॉ. सुरभि सूर्यवंशी ने 228 लोगों का व रासेयो स्वयंसेवकों की दंत जांच की।

अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
शुक्रवार दि. ३ मार्च २०२३

# राजुरा येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर

## संत्रा बागेच्या संगोपनसाठी शेण खताचा वापर करा.-डॉ. सुरेन्द्र पाटील

वरूड दि. ३ । रविंद्र इंगोले

महाराष्ट्र शासन, आर्ट ऑफ लिव्हिंग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला,वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय वरूड,कला व वाणिज्य महाविद्यालय जरुड,श्री आर. आर.लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्र मोर्शी, वाय. डी.व्ही.डी.कला व वाणिज्य महाविद्यालय तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर ग्राम राजुरा येथे २६ फेब्रुवारी २०२३ ते ४ मार्च २०२३ या कालावधीत डॉ.राजेश बुरंगे संचालक , राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायत राजुरा बाजार यांच्या सहकार्याने संपन्न होत आहे.

रासेयो शिबिरामध्ये दि.२ मार्च रोजी संत्रा उत्पादन प्रक्रिया या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ.सुरेंद्र पाटील फळशास्त्र विभाग डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर गोमकाळे ग्राम पंचायत सदस्य राजुरा बाजार हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून भाऊरावजी गोमकाळे आजीवन सभासद श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, प्रा.अशोकरावजी घोरमाडे आजीवन सभासद श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, पांडुरंगजी बहुरूपी आजीवन सभासद श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, डॉ.अनिता पाटील, अतुल आगरकर तालुका कृषी अधिकारी वरुड, हे उपस्थित होते. डॉ.सुरेंद्र पाटील यांनी शिबिरामध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना नागपूर मधील संत्रा जगामध्ये नंबर वन आहे. संत्राच्या बागेकडे व्यवसाय म्हणून पाहावे. शेतकऱ्यांनो आत्महत्या करू नका ,आत्मपरीक्षण करा. तुमच्या आजोबा-पंजोबांनी कधीही आत्महत्या केली नाही. याचा विचार करा. संत्रा लागवड करण्यापूर्वी जमिनीची तपासणी करून घेणे फार आवश्यक आहे संत्र्यासाठी एक ते दीड मीटर भुसभुशीत जमीन नंतर खाली थोडा खडक असला पाहिजे,तरच संत्रा लावा. चुनखडी १०% च्या वर असेल त्या ठिकाणी संत्रा लावू नये. असा मोलाचा सल्ला डॉ.सुरेंद्र पाटील यांनी दिला. इंडो ईस्राईल पद्धतीने संत्रा लागवडी केली असता गळ कमी होते. रासायनिक खताचा वापर कमी करून सेंद्रिय खताचा वापर जास्त करा.रासायनिक खतामुळे जमीन निकस होते तर शेणखत हे आयुर्वेदाचे काम करते असे डॉ.पाटील यांनी सांगितले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर गोमकाळे यांनी संत्रा प्रक्रिया मार्गदर्शन व्याख्यानामुळे राजुरा बाजार येथील शेतकऱ्यांना फार मोठा फायदा होणार असून भविष्यात डॉ.सुरेंद्र पाटील यांनी दिलेल्या मार्गदर्शना नुसार संत्रा शेतीची लागवड करण्यात येईल व निगा राखण्यात येईल असे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकातून डॉ.आश्विन लुंगे यांनी संत्रा प्रक्रिया मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यामागे रासेयो शिबिराची भूमिका कोणती हे समजावून सांगितली. कार्यक्रमाचे संचालन कु.श्रावणी काळे हिने केले तर आभार प्रदर्शन कु.नंदिनी मेश्राम हिने केले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. अतुल वंजारी, डॉ.रिना बकाले , डॉ. नलिनी बोडखे,रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. शशिकांत काळे, डॉ. अश्विन लुंगे, डॉ.कुसुमेंद्र सोनटक्के तसेच महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शितल पारे , प्रा.माधुरी राऊत, प्रा. प्रणिता शंकरपाळे,प्रा.प्रीती काकडे, प्रा.वंजारी मॅडम,कु.अर्चना राऊत, रासेयो सह-कार्यक्रम अधिकारी डॉ. अविनाश उल्हे,डॉ.खुशाल इंगळे, दुर्वास वाडीवे, किशोरभाऊ गोमकाळे ग्राम पंचायत सदस्य राजुरा बाजार,रवी महाजन, डॉ. चरणदास सोळंके,दिवाकर दूधकोहळे,गोपाल आजनकर, मोहम्मद अतिक,सौ कल्पनाताई डाफे ग्राम पंचायत सदस्य राजुरा बाजार,सौ रजनीताई भोंडे ग्राम पंचायत सदस्य राजुरा बाजारपंचायत सदस्य राजुरा बाजार तसेच चारही महाविद्यालयाचे ३०० रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

बहुजनांचा बुलंद आवाज
विदर्भ मतदार
अमरावती ● शनिवार, ४ मार्च २०२३ ● वर्ष ४० ● अंक २४१ ● पृष्ठ १२ | किंमत रु. ५.०० | संपादक : दिलीप एक

## संत्रा बागेच्या संगोपनासाठी शेणखताचा वापर करा





राष्ट्रीय सेवा योजना (विशेष श्रमसंस्कार शिबीर)
दि.२६ फेब्रुवारी २०२३ ते ४ मार्च २०२३
स्थळ : राजुरा बाजार,ता.वरुड,जि.अमरावती,
डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख अमृत सरोवर
राष्ट्रीय सेवा योजना






राष्ट्रीय सेवा योजना


TATA HITACHI








राष्ट्रीय सेवा योजना (विशेष श्रमसंस्कार शिबीर)



**Social Media Link**

**YouTube Link:** https://youtube.com/watch?v=Jm6ppiUQPJg&feature=share

**Twitter Link:**

1) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636415859047686144?t=nfPtv7K4onXB8nQx21S91w&s=08
2) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636066104245354496?t=zut_Xk5IOsXSh7gQh29j7Q&s=08
3) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636064292268310528?t=tRM6BFfd7p1C6ig9mB_7Vw&s=08
4) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636063088096219136?t=M7nrWrb2kzyohmpTSSbAIw&s=08
5) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636061952182214664?t=5hD0Kwz8YF3hVqVzzmdlFg&s=08
6) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636061003992686601?t=6zE-UAVzCX5kv54HdDjUMA&s=08
7) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636059705721389056?t=B4nKhKzz7ud4SuFGX9dd8g&s=08
8) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636058824217092100?s=08
9) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636057432706408451?t=N6sqr08-HxoVA3v7pdUVjg&s=08
10) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636056565781344263?t=LOkvnfkrmm0kSQpQif99Ug&s=08
11) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636054938047348736?t=FpxCoo6rlVeHrk_KEOUobg&s=08
12) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1636053481940213760?t=tnCSzUs9VWIdNV9pXZXvLw&s=08
13) https://twitter.com/NSSMFMWarud/status/1628070871922507778?t=CPYdBwczjYuK2E2JRwaABA&s=08

**महात्मा फुले कला,वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय,वरुड**

सुरळी ग्रामपंचायत कार्यालयाला भेट

राज्यशास्त्र विषयाच्या बी. ए. भाग १ च्या विद्यार्थ्यांनी प्राचार्य जि.एन.चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळी ग्रामपंचायत ला भेट दिली. तेथील प्रशासकीय कामकाज पाहणी व इतर बाबींची माहिती घेतली. यावेळी तेथील सरपंच सौ. शुभांगीताई मरस्कोल्हे आणि सचिव श्री. नरहरी गायधने यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रश्नाविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे सहकार्य केले. तेथील सर्व सदस्य व कर्मचारी यांनी सुद्धा सहकार्य केले. यावेळी राज्यशास्त्र विभागाच्या प्रा. प्रणिता शंकरपाळे उपस्थित होत्या. व विद्यार्थी उपस्थित होते.
खालील विद्यार्थी उपस्थित होते

१) मनीष सिरसाम
२) नयन ठाकरे
३) विवेक धाडसे
४) अंकिता बांगडे
५) गायत्री थोटे
६) किरण राऊत
७) निशा भिसे
८) सेजल बागडे
९) तेजस्विनी बागडे
१०) रुपाली चौधरी
११) वैशाली उईके
१२) वैष्णवी कुयटे



Shri. Shivaji Education Society Amravati's

# Mahatma Fule Arts, Commerce & Sitaramji Chaudhari science Mahavidyalaya, Warud.

## Eco-Friendly Holi Colour Making Workshop
## At New English Primary School, Warud
## Extension Activity 2022-23


Every year department of Botany organizes Eco-Friendly holi awareness program on the occasion of "Holi Festival". But this year it was organized for the students of New English Primary School, Warud.

Eco-Friendly holi awareness program is the extension activity of our department. This year our department organized Eco-Friendly holi colour making workshop. In this event Dr. Pranjali Deshmukh was give the Demonstration of Natural Colour using the various plant material like Flowers of Palas, Katesavar, Hibiscus, Rose, Leaf of Spinach, Fruits of Mayalu plant, And Bark of Arjuna etc.

The motto of this activity was to create awareness among the students regarding use of Natural colors only on this day. Mostly, the natural colors are made from plant materials. These colors are safer than chemically prepared ones.

The Inaugurator & Chief Guest of the event was Dr. Pranjali J. Deshmukh, Assistant Professor of Botany Department actively participated in this event. President of the program Respected Miss. Komal Madam, the coordinator of this event Miss. Monika Ingle madam, Teaching and non-teaching staff members of the school also supported this activity. Students also actively Paticipated into the workshop. Total 48 students get benefitted from this workshop.

**Some Glimpse of the Workshop.**






Date :- 9/03/2023

Dr. P. J. Deshmukh
Program Incharge

Dr. G. N. Chaudhari
Principal